नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २४/०८/२०२६ (सोमवार )

......................................................................................

## खुन करणाऱ्या आरोपींना मा. न्यायालयाने सुनावली आजीवन कारावासाची शिक्षा

**पोलीस स्टेशन काटोल** :— पोलीस स्टेशन काटोल येथे अप. क्र. १६१/२०२१ कलम ३०२, ३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, यातील फिर्यादी नामे सौ. पल्लवी प्रतीक गजबे, रा. अर्जुन नगर काटोल हिचा दिर  नितेश उर्फ गिरीष लिलाधर गजबे यास यातील आरोपी नामे **१) करण रवींद्र गवळी, वय २० वर्ष, रा. सुंदरनगर, नागपूर  आणि २) अर्जुन मोरेश्वर माटे, वय २१ वर्ष, रा. सुंदरनगर, नागपूर** यांनी जुन्या झगडयाच्या कारणावरून वाद करून मृत कनामे नितेश उर्फ गिरीष लिलाधर गजबे, वय २१ वर्ष, रा. अर्जुन नगर काटोल यास चाकुने मारहाण करून गंभीर जख्मी करून जिवानीशी ठार केले.

**तपासी अधिकारी श्री महादेव आचरेकर, पोलीस निरीक्षक यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक २४/०८/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं ०२, श्री आर. एम. मिश्रा यांनी नमुद आरोपी क्र. १) आणि २) यांना कलम ३०२, ३४ भादवि मध्ये आजीवन कारावास व  २,०००/— रूपये  दंड , दंड न भरल्यास ०६ महिने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री राम अनवणे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री. पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री. रणजित सिरसाठ प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन काटोल, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री गणेश

भुरे, ब.नं १५८२, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी पोहवा बाबा नेवारे, ब. नं. ८२ पोलीस स्टेशन काटोल यांनी मदत केली आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. १ लाख ७९ हजार ५८० रूपयांचा मुद्देमाल जप्त कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक २३/०८/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्तबामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा फेटरी स्मशान घाट परीसर येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. कळमेश्वर पोलीसांनी तात्काळ कारवाई करत घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे **०१) अमित तुकाराम अखंड, वय ३५ वर्ष, रा. फेटरी २) प्रफुल चन्द्रशेखर, वय २७ वर्ष, रा. माहुरझरी, ३) विलास शंकर उरकुडे, वय ३२ वर्ष, रा. फेटरी ४) आकाश बाबुलालजी नारनवरे, वय ३० वर्ष रा. फेटरी** हे जागीच जुगार खेळतांना मिळुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ ताशपत्ते, एकुण रोख रक्कम १५८०/—रुपये,तीन मोटर सायकल, तीन मोबाईल असा एकुण १,७९,५८० /— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. नमुद प्रकरणी प्रकरणी वरील आरोपी यांच्या विरुद्ध कलम १२ म.जू.का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**



## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ५० हजार ८८० रूपयांचा मुद्देमाल जप्त, सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक २३/०८/२०२६ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने एक इसम अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा वार्ड क्र. १ गुमती, कामठी येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान ॲक्टीवा क्र. एम. एच—४०/सी.जे.—२१९० मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता गाडीचे डीक्कीमध्ये देशी दारूच्या निपा मिळुन आल्या. **आरोपी नामे पुरुषोत्तम तुळशीराम सेवारे, वय ७० वर्ष, रा. वार्ड क्र १, गुमती, कामठी हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष देशी दारूच्या १३ निपा किंमती ८८०/—रूपये,** मोटरसायकल क्र. एम.एच—४०/सी.जे.—२१९० **किंमती ५०,०००/—रू असा एकुण किंमती ५०,८८०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी पुरुषोत्तम तुळशीराम**

**सेवारे, वय ७० वर्ष, रा. वार्ड क्र १, गुमती, कामठी याचेविरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०४ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २३/०८/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयात विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०४ आरोपीतांवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन केळवद** अंतर्गत आरोपी १) शिवकुमार खेमचंद कच्छवा, वय २७ वर्षे, रा. वार्ड क्र. १, केळवद, ता. सावनेर २) पंडीत गणपत बमनोटे, वय ७० वर्ष, रा. वार्ड क्र. १, केळवद, ता. सावनेर हे कपीलेश्वर मंदीर जवळील स्मशान घाटाला लागुन सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी १) वैभव सुनिल भुररेवार, वय ३० वर्ष, रा. मोहन नगर, वीटीसी नागपूर जिल्हा नागपूर २) समिरूद्दीन मुनिद्दिन फारूकी, वय ३५ वर्ष, रा. संतोष माता मंदिर जवळ, गोवा कॉलोनी नागपूर जिल्हा नागपूर हे मौजा वाकी दरबार येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०६ गुन्हे नोंद. एकुण २,२८,२४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक २३/०८/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते व रोख रक्कम असा एकुण २,२८,२४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १) गणेश राख्याजी बावणे, वय ३७ वर्ष २) रतन गणपत चौरसिया, वय ६७ वर्ष, ३) महेन्द्र सुभेवार सुरवार, वय ३५ वर्ष, ४) गोलु जथरे, वय ३४ वर्ष, सर्व रा. बेलोना, ता. नरखेड ५) गोलु शेषराव वानखेडे, वय ३२ वर्ष ६) मानसिंग हनुमंतसिंग जकनावत, वय ३६ वर्ष, ७) शेरू प्रतापसिंग रेनावत, वय ३५ वर्ष, ८) निखील गौर, वय ३३ वर्ष, सर्व रा. बेलोना, ता. नरखेड ९) मारोती अर्जुन नेहारे, वय ४९ वर्ष १०) संजु संतोषराव धुर्वे, वय ३१ वर्ष, ११) युवराज उपासराव कवडती, वय ५५ वर्ष, तिन्ही रा. येणीकोणी १२) निखील रामुजी उईके, वय ३३ वर्षे, १३) जितेंद्र गणेशराव गोतमारे, वय २८ वर्ष १४) सतीश शंकरराव डोंगरे, वय २८ वर्षे, १५) किशोर शंकरराव कडबे, १६) तुषार सुरेश डाखोळे, वय २८ वर्ष, सर्व रा. येणीकोणी, तह. नरखेड, जि. नागपूर हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे १) वृषभ आनंद शेंडे, वय २८ वर्ष, रा. खरबी, हसनबाग जिल्हा नागपूर २) शुभम विजयराव अतकरे, वय २६ वर्ष, रा. नवापूर, नागपूर ३) प्रज्वल दीपक सोनकुसरे, वय २० वर्ष, रा. महात्मा फुले बाजार, सावनेर ४) रुपेश मुंदेकर, वय २७ वर्ष, राहणार लालगंज नागपुर, ५) अंकुश वसंत सारंगपुरे, वय ३३ वर्ष, रा. श्रावण नगर ,वाठोळा ६) स्वप्निल शेषराव कुंबरे, वय २६ वर्ष, रा. बिरसा मुंडा, जलालखेडा हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी नामे अमित तुकाराम अखंड, वय ३५ वर्ष, रा. फेटरी २) प्रफुल चन्द्रशेखर, वय २७ वर्ष, रा. माहुरझरी ३) विलास शंकर उरकुडे, वय ३२ वर्ष, रा. फेटरी ४) आकाश बाबुलालजी नारनवरे, वय ३० वर्ष, रा. फेटरी हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १३ गुन्हे नोंद

दिनांक २३/०८/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू तसेच वाहन असा एकुण ६१,४१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे भुमेश्वर सेवकराम बनवाडे, वय ४० वर्ष, मारोडी ता. मौदा याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान येथे** आरोपी नामे १) राजेश लल्लू नायक, वय ४५ वर्ष, रा. खंदान नं. ०३, कन्हान ता.पारशिवनी २) राजेश रामदास चकोले, वय ४६ वर्ष, रा. निलज खंडाळा कन्हान, ता.पारशिवनी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड येथे** आरोपी नामे १) दिपक खुशालसिंग जखनावत, वय ३३ वर्ष, रा. मोवाड तह. नरखेड २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड येथे** आरोपी नामे दिपक वनरात चहादे, वय ४१ वर्ष, रा. सेव, ता. उमरेड, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर येथे** आरोपी नामे १) प्रशांत भगवान बरवड, रा. धापेवाडा २) पुरुषोत्तम तुळशीराम सेवारे, वय ७० वर्ष, रा. वार्ड क्र. १, गुमती, कामठी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन केळवद येथे** आरोपी नामे १) सुखदेव गवतु बागडे, वय ७० वर्षे, रा. वार्ड क्र. ३, ता. सावनेर २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा येथे** आरोपी नामे १) पंकज मधुकर परतेती, वय ३० वर्ष, रा. ढकारा, ता. सावनेर, जि. नागपुर २) मायगो मधुकर वरकडे, वय ३८ वर्ष, रा. कोथुळणा, ता. सावनेर, जि. नागपुर ३) शिवशंकर उर्फ शक्ति नंदलाल ठाकुर, वय ४३ वर्ष, रा. कोथुळणा, ता. सावनेर, जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद

**नमुद कारवाईत एकुण १५७५० मिली देशी दारू, ४४ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ६१,४१०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**